# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण  **P.S.(ठाणे):** सिल्लोड सिटी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0065  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**06/04/2026 20:11

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिंनाक पासून):** 06/04/2026

**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 06/04/2026

**Time From (वेळेपासून):** 10:14 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 06/04/2026  **Time (वेळ):** 14:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 013

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 06/04/2026 20:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय सिल्लोड,सिल्लोड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** वाल्मिक निंबा कोरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गारखेडा, छत्रपती संभाजीनगर,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | गारखेडा, छत्रपती संभाजीनगर,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9623565310

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हारुन अजीज शेख | | | 1. तहसिल कार्यालय सिल्लोड , सिल्लोड ,सिल्लोड सिटी, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | युवराज अभिमान तायडे | | | 1. जय भवानी नगर सिल्लोड,सिल्लोड ,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 06/04/2026

मी वाल्मिक निंबा कोरे, वय 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर रा. गारखेडा, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9623565310

मी दिंनाक 06/04/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस अधीक्षक यांचेकडुन संदेश प्राप्त झाला की, तक्रारदार श्री. श्रीराम रामकिसन सागरे, वय-45, धंदा- ट्रॅक्टर चालवणे, रा. मु. केन्हाळा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांची ओळख करुन देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेवुन पुढील कारवाई करणेबाबत आम्हास तोंडी आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना मोबाईल द्वारे संपर्क साधला असता त्यांनी सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी कारवाई करिता येणेस सांगितले. त्यावरुन आम्ही सापळा पथक व पंचासह कार्यालयातुन रवाना होवुन सिल्लोड या ठिकाणी येवुन तक्रारदार यांची भेट घेतली. त्यावेळी मी तक्रारदार श्री श्रीराम सागरे यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करुन दिली. मी सर्वांना तक्रारीची पडताळणी करणार आहोत असे सांगीतले. सदरवेळी तक्रारदार यांना पंचासमक्ष विचारल्यावरुन त्यांनी त्यांची तक्रार लेखी लिहुन दिली. ती पुढील प्रमाणे.

" मी श्रीराम रामकिसन सागरे, वय-45, धंदा- ट्रॅक्टर चालवणे, रा. मु. केन्हाळा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर, मी वरीलप्रमाणे असुन, वरील पत्यावर परिवारासह राहण्यास आहे माझ्या मालकीचा महिंद्रा युवो-575 MH-21 AN-2635 हा वाळुवर केन्हाळा ते फर्दापुर या भागात चालवित असतो, त्यासाठी आवश्यक गौण खनिज परवाना मी महसुल विभागात शासकिय फी भरुन घेत असतो. त्यातुन येणाऱ्या उत्पन्नावर माझा आणि माझ्या परिवाराचा उदरनिर्वाह चालतो.

दि. 04/04/2026 रोजी मी माझे भरलेले वाळुचे ट्रॅक्टर फर्दापुर या ठिकाणी घेवुन जात असताना नायब तहसिलदार हारुन शेख यांनी त्यांची पांढऱ्या रंगाची क्रेटा कार माझ्या ट्रक्टरला आडवी मारुन थांबवीले होते. त्या वेळी हारुन शेख यांनी माझ्या ट्रॅक्टरचे कागदपत्र पाहुन तुझ्या ट्रॅक्टरमध्ये जास्त वाळु भरलेली दिसत आहे. तुझ्यावर केस दाखल करावी लागेल असा दम भरला. त्यावेळी मी त्यांना ट्रॅक्टर सोडण्यास विनती केली असता त्यांनी ट्रॅक्टर सोडण्यासाठी त्यावर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी पैशाची मागणी केली. त्यावेळी माझ्या खिशात फक्त 4,000/- रुपये असल्याचे सांगितले असता त्यांनी ते पैसे त्यांनी देण्यास सांगितले. मी माझ्याकडील ते 4,000/- रुपये नायब तहसिलदार हारुन शेख यांना दिले असता, त्यांनी सांगितले की, मला अजुन 25,000/- रुपये सोमवारी ऑफिसमध्ये आणुन दे नाहीतर तुझ्या ट्रॅक्टरवर केस दाखल करुन वाळुची वाहतुक करु देणार नाही. त्यावेळी मी नायब तहसिलदार हारुन शेख यास सोमवारी येवुन भेटतो असे सांगुन माझे ट्रॅक्टर सोडवुन निघुन गेलो होतो.

मला नायब तहसिलदार हारुन शेख यांस ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी लाच देण्याची ईच्छा नव्हती म्हणुन मी दि. 04/04/2026 रोजी मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर श्रीमती कांगणे मॅडम यांना फोनवर संपर्क साधुन हारुन शेख नायब तहसिलदार यांने केलेल्या लाच मागणी बाबत तोंडी तक्रार केलेली होती. मी आज दि. 06/04/2026 रोजी तहसिल कार्यालय, सिल्लोड या ठिकाणी नायब तहसिलदार हारुन शेख यांची ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी भेट घेणार आहे. त्यावेळी हारुन शेख यांने माझ्याकडे पुन्हा लाचेची मागणी केल्यास त्याच्यावर

कायदेशीर कारवाई करावी. माझ्यात आणि हारुन शेख नायब तहसिलदार याच्या दरम्यान कोणतेही पैशाची देवान घेवानीचा व्यवहार नाही. आमच्या दोघात कोणतीही दुश्मनी नाही. माझी तक्रार मी स्वत:च्या हाताने लिहीली असुन ती बरोबर व खरी आहे " वगैरे मजकुराची लेखी तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री श्रीराम सागरे यांची लेखी तक्रार माझ्यासह पंचांनी वाचुन त्यावर सहया केल्या. तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार श्री. श्रीराम सागरे व पंच क्रं.1 यांचेसह हारुन शेख, नायब तहसिलदार यांचे कार्यालयात पाठवुन तक्रारी प्रमाणे हारुन शेख, नायब तहसिलदार हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथक गोपनिय ठिकाणी जावुन पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, त्यामध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार श्रीराम सागरे व पंचांची खात्री करुन दिली. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु बंद करण्याचे प्रात्याक्षीक दाखवले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 10.14 वा.चालु करुन, तो तक्रारदार श्री. श्रीराम सागरे यांचे गळयात दोऱ्याचे सहाय्याने अडकवुन तक्रारदार व पंच नं. 01 यांना हारुन शेख, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचेकडील जुनी वापरती मोटार सायकर क्र MH-20 BH-0803 वर पाठविले. तक्रारदार व पंच क्रं 1 असे हारुन शेख, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड येथे जावुन, कामासंदर्भात भेट घेवुन पुन्हा आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 11.42 वाजता बंद केला. आम्ही प्रथम पंच क्रं. 1 यांना हारुन शेख यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी तक्रारदार श्रीराम सागरे यांचे सोबत तहसिल कार्यालय, सिल्लोड येथे गेलो असता, नायब तहसिलदार हारुन शेख व युवराज तायडे यांची कार्यालयाच्या समोर तक्रारदारासोबत भेट झाली. सदर भेटीत हारुन शेख याने तक्रारदार यांचे ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी प्रथम 25,000/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडीअंती 15,000/- रुपये स्विकारण्याचे कबुल केले. तसेच लाचेची रक्कम युवराज तायडे यांचे जवळ सुर्पुद करण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. श्रीराम सागरे यांच्याकडे घडलेल्या घटनेबाबत चौकशी केली असता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांचे प्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेर्काडर चालु करुन त्यामधील कैद तक्रारदार, हारुन शेख आणि युवराज तायडे यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता " मंग तुम्हाला त्या दिवशी दिंल होत ना त्यांन... कोण किती मध्ये झालंत.. पंचवीस.. पंचवीसमध्ये झालं होत ना..त्यांनी किती दिले तुम्हाला पंचवीस हजारामधुन चार हजार रुपये आता किती देणं आहे मी तुमचाच आहे ना साहेब आपल नेहमीच आहे ना.. आता किती देवु काय दे आत वीस देवुन टाक लय होतात नं.. साहेब वीस.. महिनाभर हात नाही लावणारनं मंग वीस हजार लय होतात नां हो.. तुम्ही किती बोलले होते त्या दिवशी मंग त्याला‌ना मी पंचवीस मंग मी देवु किती काही हिशोबाने सांगाना, काय दयायचे दे फोन पे करु का कॅश करु कॅश कर कॅश मंग मला बँकेत जाव लागल मंग जा आरामान अनं याच्याकडे दे दहा मी आत्ता देतो पाच नंतर देईल.."असे संभाषण झाल्याचे ऐकु आले. सदर संभाषणातुन हारुन शेख याने तक्रारदाराकडे ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी प्रथम 25,000/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडीअंती 15,000/- रुपये लाचरक्कम खाजगी इसम युवराज तायडे यांचेकरवी लागलीच स्विकारण्याचे कबुल केल्याचे निष्पन्न झाले. आम्ही तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे व हारुन शेख यांनी केलेल्या लाचमागणीच्या अनुषंगाने सापळा कारवाई सुरु केली.

त्यानंतर तक्रारदार श्रीराम सागरे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 100/- रुपये दराच्या 98 भारतीय चलनी नोटा व 200/- रुपये दराची 01 भारतीय चलनी नोट असे एकुण 10,000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार श्रीराम सागरे व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 10,000/- रुपये तक्रारदार श्रीराम सागरे यांच्या पँटच्या उजव्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, युवराज तायडे यांनी लाच रक्कम स्विंकारल्यानतर तक्रारदार यांनी त्यांच्या डोक्याला बांधलेला उपरण काढुन गळयात अडकवण्याचा इशारा नेमुण दिला. त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 12.22 वा चालु करुन तो तक्रारदार श्रीराम सागरे यांचे गळयात अडकवुन तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी त्यांचेकडील जुनी वापरती मोटारसायकलने युवराज तायडे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील शासकिय वाहनाने तहसिल कार्यालय, सिल्लोड जि. छत्रपती

संभाजीनगर येथे आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे हारुन शेख यांनी सांगितल्याप्रमाणे खाजगी ईसम श्री. युवराज तायडे यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय, सिल्लोड येथील सेतु सुविधा केंद्र, येथे गेले. त्यानंतर तक्रारदार श्री. श्रीराम सागरे यांनी त्यांचे जवळील लाच रक्कम सेतु सुविधा केंद्र चालक श्री. युवराज तायडे यांचेकडे दिली. त्यानंतर तक्रारदार सेतु सुविधा कार्यालयाजवळ येवुन डोक्यावर बांधलेला उपरण काढुन गळयात अडकवुन लाच स्विकृतीचा 12.35 वा. पुर्व नियोजीत ईशारा करीत असल्याचे पाहिले. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन तक्रारदार व पंच क्र. 01 यांचे जवळ येवुन तक्रारदाराचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद केले.
त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं.2 यांचेसमक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगितले की, मी व तक्रारदार असे हारुन शेख यांनी सांगितल्याप्रमाणे सेतु सुविधा केंद्र चालक श्री. युवराज तायडे यांची त्यांचे सेतु सुविधा केंद्राजवळ जावुन भेट घेतली. त्यानंतर तक्रारदार श्री. श्रीराम सागरे यांनी श्री. युवराज तायडे यांचे सोबत ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी चर्चा केली. त्यावेळी श्री. युवराज तायडे यांनी तक्रारदार यांनी लाच रक्कम आणल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार यांचे ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी बोलुन त्यांचे सेतु सुविधा केंद्राचे बाहेर लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर युवराज तायडे याने त्याचे मोबाईल वरुन आलोसे हारुन शेख यांचे तक्रारदारासोबत बोलणे करुन लाचरक्कम स्विकारल्याचे सांगितले.त्यानंतर तक्रारदाराने डोक्याला बांधलेला उपरण काढुन गळयात अडकवुन लाच स्विकृतीचा नियोजीत इशारा केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील कैद तक्रारदार, श्री. युवराज तायडे यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता " मी फोनचं.. तुम्ही दिसले इथं.. त्याच्या करता म्हणलं इथंच बसले तायडे साहेब.. आता दहा तुमच्या कडे देवुन टाकतो.. पाच नंतर देतो.. पाच कधी देणार.. पाच कोणाकड देवु.. माझ्याकड दया.. तुमच्याकडंदेवु का.. का सायबाकडं.. नाही माझ्याकडेच दया साहेब कसकाय घेतील ते नाही का डायरेक्ट कसं काय घेतील ते इथुन जातं ते मला पाकीटात टाकुन तिंकड दया लागतं.. बरं मला त्रास नको बरका तायडे साहेब.. अहो साहेब माझा सेतु आहे तो माणुस राजा माणुस हे तमुच्या सारख्या.. पाच हजार गपकन कमी केले की, नाही मला पाहिल्या पाहिल्याच..चालन चालन मोजुन घ्या बरं का दहा हजार रुपये हे ते बरोबर त्याना फोन करुन देता का, फोन वर सर हा दहा दिले त्यांनी पाच उदया देतो म्हणे हे बोलुन ध्या बोला बोला तुम्ही मी कशाला हॅलो हारुनसाहेब राम राम आपलं जे ठरलं होत ना पंधरा हजार रुपये त्याच्यातुन दहा हजार रुपये तुमच्या कडं देवु का तायडे साहेबांकड जमा करु, नायब तहसिलदार यांचे कक्षात जावुन तायडे साहेबांकडे दिले." असे झालेल्या संभाषणामध्ये लाचमागणीची रक्कम स्विकारलेली आहे या वरुन अलोसे हारुन शेख यांनी तक्रारदार यांचे ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी तक्रारदाराकडे 10,000/- रुपये लाच रक्कम सेतु सुविधा केंद्र चालक श्री. युवराज तायडे यांचे मार्फतीने स्विकारल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर आम्ही पंचासमक्ष सेतु सुविधा केंद्र, तहसिल कार्यालय, सिल्लोड येथे खुर्चीत बसलेल्या इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव युवराज अभिमान तायडे, वय-56 वर्षे व्यवसाय सेतु सुविधा केंद्र चालक, तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रककम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी हारुन शेख यांचे सांगण्यावरुन 10,000/- रु. लाचेची रक्कम उजव्या हाताने तक्रारदार यांचेकडुन घेवुन मोजली व माझ्या पॅंटच्या उजव्या खिशात ठेवल्याचे सांगीतले. तेव्हा सदर लाचेची रक्कम पंच क्रं.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याने दिलेल्या नोटेशी खात्री करता ती तीच असल्याचे दिसुन आले. तसेच पंचासमक्ष अल्ट्रा व्हॅायलेट प्रकाशाचे उजेडात श्री. युवराज तायडे यांचे दोन्ही हात, नेसणीस असलेली पॅंट व पॅंटच्या उजवा खिसा यावर कृत्रीम अंधार करुन तपासला असता त्यावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर त्यास ताब्यात घेवुन आम्ही तहसिल कार्यालय, सिल्लोड येथील नायब तहसिलदार यांचे कक्षात जावुन तेथे बसलेल्या इसमास पंच व पोलीस पथक यांची ओळख पटवुन त्यास नाव पत्ता विचारले असता हारुन अजीज शेख, वय 56 वर्षे व्यवसाय नोकरी पद निवासी नायब तहसिलदार, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगितले. त्यांनतर आम्ही विचारल्यावरुन त्याने पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार यांचे ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी लाच रक्कम सेतु सुविधा केंद्र चालक श्री. युवराज तायडे यांचेकडे देण्यास सांगितले होते. आलोसे हारुन शेख याच्या ताब्यात जुना वापरता रियल मी कंपनीचा मोबाईल तर खाजगी इसम युवराज तायडे यांचे ताब्यात जुना वापरता विओ कंपनीचा मोबाईल आणि लाचरक्कम 10,000/- रुपये ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी पोलीस ठाणे, सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर ग्रामिण येथे घेवुन आलो. तरी दि.

06/04/2026 रोजी 10.14 वा ते 12.38 वा दरम्यान तहसिल कार्यालय, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर याठिकाणी यातील मुळ तक्रारदार श्रीराम रामकिसन सागरे, वय-45, धंदा- ट्रॅक्टर चालवणे, रा. मु. केऱ्हाळा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या ट्रॅक्टरवर केस न करण्यासाठी आणि वाळुची वाहतुक सुरळीत चालु ठेवण्यासाठी आलोसे हारुन शेख यांनी प्रथम 25,000/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडीअंती 15,000/- रुपये स्विकारण्याचे कबुल केले. सदर लाचरक्कमेपैकी 10,000/- रुपये लाचेची रक्कम आलोसे हारुन शेख याचे सांगण्यावरुन खाजगी इसम श्री. युवराज अभिमान तायडे वय-56 वर्षे व्यवसाय सेतु सुविधा केंद्र चालक रा. जय भवानीगर, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर याने स्विकारले. सदरची लाच रक्कम स्विकारल्यानतर आलोसे हारुन शेख व खाजगी इसम युवराज तायडे यांच्या दरम्यान मोबाईलवर तक्रारदार व पंचासमक्ष झालेल्या संभाषणातुन दोघांनीही लाच रक्कम मागणी पासुन ते लाच रक्कम स्विंकरण्यापयत भ्रष्टाचारास प्रोत्साहन दिले आहे. सबब आलोसे हारुन अजीज शेख व खाजगी इसम युवराज तायडे यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7, 7(अ), 12 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशिर फिंयाद आहे. माझा फिंयादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे. समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sheshrao abaji udar(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

PI Kore

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sheshrao abaji udar

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI

ठाणे अंमलदार
पो.स्टे.सिल्लोड शहर